# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:29.05.2025** **वार:गुरुवार**

---

1. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अर्थविषयक समितीची खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमती वाढविण्यास मान्यता
2. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील दोन रेल्वे प्रकल्पांनाही मंजुरी
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सिक्कीम, पश्चिम बंगाल आणि बिहारमधल्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन
4. राष्ट्रीय संरक्षण अकादमी अर्थात एनडीएचा 148 वा दीक्षांत सोहळा. आज पहिल्यांदाच एनडीए मधून महिला कॅडेट्सची पहिली तुकडी उत्तीर्ण होणार आणि
5. सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचं विजयी पुनरागमन

**मंत्रिमंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक सल्लागार समितीनं 2025-26 या चालू विपणन हंगामासाठी चौदा खरीप पिकांची किमान आधारभूत किंमत अर्थात एम एस पी वाढविण्यास मान्यता दिली आहे. अर्थविषयक सल्लागार समितीची बैठक काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यामध्ये हे निर्णय घेण्यात आले. माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्ली इथं या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना ही माहिती दिली. या दरवाढीमुळे उत्पादकांना त्यांच्या उत्पादनासाठी लाभदायक किंमती मिळू शकतील, असं वैष्णव यांनी सांगितलं.

गेल्या वर्षीच्या किमान आधारभूत किंमतींपेक्षा यंदा सर्वाधिक वाढ कारळाच्या दरामध्ये करण्यात आली असून हा दर आता 820 रुपये झाला आहे. नाचणीसाठी 596 रुपये प्रति क्विंटल, कापसासाठी 589 रुपये प्रति क्विंटल आणि तिळासाठी 579 रुपये प्रति क्विंटल दर प्रस्तावित आहे. अन्नधान्य उत्पादन खर्चापेक्षा 50 टक्के अधिक दर यावेळी किमान आधारभूत किंमत निश्चित करताना ठेवण्यात आला असून तो आत्तापर्यंतचा सर्वाधिक दर असल्याचं सरकारनं नमूद केलं आहे. देशातील 7 कोटी 71लाख शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

याशिवाय शेतकऱ्यांसाठी 2025-26 साठी सुधारित व्याज सवलत योजना चालू ठेवण्यास देखील मंत्रिमंडळानं मान्यता दिली आणि त्यासाठी आवश्यक दोन लाख सात हजार कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जावरील व्याजाच्या दीड टक्के अनुदानात काहीही बदल न करता ते तसंच सुरू ठेवण्याचा निर्णयदेखील कालच्या बैठकीत घेण्यात आला.

मंत्रिमंडळानं कालच्या बैठकीत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशमधील रेल्वेच्या दोन बहुमार्गिका अर्थात मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांना मान्यता दिली आहे. यामध्ये दिल्ली-चेन्नई रेल्वे मार्गावरच्या वर्धा ते बल्लारशा रेल्वेमार्गादरम्यानच्या चौथ्या मार्गाचा समावेश आहे. या दोन प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेचं जाळं सुमारे 176 किलोमीटरने वाढेल, असं वैष्णव यांनी सांगितलं. या प्रकल्पांचं काम 2029-30 पर्यंत पूर्ण केले जाणार आहे.

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सिक्कीम, पश्चिम बंगाल आणि बिहार या तीन राज्यांच्या दौऱ्यावर जात असून त्यांच्या हस्ते विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन होणार आहे. सिक्कीममध्ये, पंतप्रधान मोदी आज सकाळी गंगटोकमध्ये 'सिक्कीम @ फिफ्टी' या सिक्कीम राज्याच्या राज्यस्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

सिक्कीमचे राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पंतप्रधानांच्या हस्ते नामची इथं 750 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन होणार आहे. पश्चिम बंगालच्या दौऱ्यात पंतप्रधानांच्या हस्ते आज दुपारी अलीपुरद्वार आणि कूचबिहार जिल्ह्यांमध्ये शहर गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी होणार आहे. तर बिहारमध्ये आज संध्याकाळी पाटणा विमानतळाच्या नव्यानं बांधलेल्या प्रवासी टर्मिनलचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**<u>मणिपूर</u>**

मणिपूरमध्ये, दहा आमदारांनी काल इंफाळ इथल्या राजभवनात मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांची भेट घेतली आणि राज्यात सरकार स्थापनेचे काम जलदगतीनं करण्याचं आवाहन राज्यपालांना केलं. राज्यपालांसोबत या पथकानं राज्यातील कायदा- सुव्यवस्था आणि राजकीय परिस्थितीवर चर्चा केली. तसंच या मुद्द्यांवर राज्यपालांना एक निवेदनही सादर केलं.

**<u>एनडीए</u>**

पुण्यातल्या राष्ट्रीय संरक्षण अकादमी अर्थात एनडीएचा 148 वा दीक्षांत समारंभ सोहळा आज होणार आहे. गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाच्या कुलगुरू प्राध्यापिका डॉक्टर पूनम टंडन यांच्या हस्ते आज पदवी प्रदान सोहळा होईल, तर उद्या होणाऱ्या दीक्षांत संचलंन सोहळ्याला मिझोरमचे राज्यपाल निवृत्त जनरल डॉक्टर विजय कुमार सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. यंदा पहिल्यांदाच एनडीए मधून महिला कॅडेट्सची पहिली तुकडी उत्तीर्ण होणार असल्यानं हा दीक्षांत सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

जगात सर्वाधिक लोकसंख्येचा देश असलेल्या भारतात लोकसंख्याशास्त्रातलं संशोधन अभ्यासक्रमापुरतं मर्यादित राहता कामा नये, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. मुंबईत आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या दीक्षांत समारंभामध्ये ते काल बोलत होते. देशाला शाश्वत विकासाच्या दिशेने घेऊन

जाण्यात लोकसंख्याशास्त्र अमूल्य योगदान देतं, यातल्या आकडेवारीच्या आधारे शाश्वत विकास, आर्थिक प्रगती, सामाजिक एकोपा, तसंच देशाच्या सुरक्षेततेच्या हिताची धोरणं आखता येतात, याकडे उपराष्ट्रपतींनी लक्ष वेधलं. लोकसंख्या, लोकशाही आणि विविधता हे नव्या भारताचे तीन आधारस्तंभ असून लोकसंख्येचा अभ्यास करणारे विद्यार्थी या तिन्ही स्तंभांच्या मध्यभागी राहून आकडेवारी आणि धोरणनिर्मिती यातला दुवा म्हणून महत्त्वाचं काम करू शकतात, असंही उपराष्ट्रपती म्हणाले.

**<u>प्रगती-बैठक</u>**

केंद्र आणि राज्य सरकारांचा समावेश असलेल्या सक्रिय प्रशासन आणि वेळेवर अंमलबजावणीसाठी बहु-पद्धती व्यासपीठ असलेल्या प्रगती बैठकीचं अध्यक्षस्थान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल भूषवलं. या बैठकीत पंतप्रधानांनी 62 हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या तीन प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेतला. हे प्रकल्प विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील रस्ते वाहतूक, वीज आणि जलसंपदा या क्षेत्रांशी संबंधित आहेत. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यासाठी आणि त्यांची वेळेवर पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचं आवाहन मोदी यांनी केलं. या बैठकीत, पंतप्रधानांनी भारतातील सेमीकंडक्टर परिसंस्थेच्या विकासाशी संबंधित उल्लेखनीय सर्वोत्तम पद्धतींचाही आढावा घेतला. आतापर्यंत झालेल्या प्रगतीच्या बैठकींमध्ये, सुमारे 20 लाख 64 हजार कोटी रुपये खर्चाच्या 373 प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला आहे.

**<u>अमेरिका-व्हिसा</u>**

अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या चिनी विद्यार्थ्यांचे व्हिसा आक्रमकपणे रद्द करण्याचं अमेरिकी प्रशासनानं जाहीर केलं आहे. परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी एका निवेदनात सांगितलं की चिनी कम्युनिस्ट पक्षाशी संबंध असलेल्या किंवा महत्त्वाच्या क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्यांचा यात समावेश असेल. चीन आणि हाँगकाँगमधून भविष्यात येणाऱ्या व्हिसा अर्जदारांची छाननी वाढविण्यासाठी निकषांमध्येही सुधारणा केली जाईल. दोन महासत्तांमध्ये परस्परविरोधी व्यापार युद्ध सुरू झाल्यानं अलिकडच्या काही महिन्यांत बीजिंग आणि वॉशिंग्टनमधील संबंध बिघडले आहेत. रुबियो यांनी सोमवारी जगभरातील अमेरिकन दूतावासांना विद्यार्थी व्हिसासाठी मुलाखतीचे वेळापत्रक करणे थांबवण्याचे आदेश दिले. अमेरिकेचा परराष्ट्र विभाग अशा अर्जदारांच्या सोशल मीडियाची तपासणी वाढविण्याची तयारी करत आहे. ट्रम्प प्रशासनानं आधीच अनेक परदेशी विद्यार्थ्यांना हद्दपार करण्याचा निर्णय घेतला आहे, तर इतरांसाठी हजारो व्हिसा रद्द केले आहेत. यापैकी अनेक कृतींवर न्यायालयांनी स्थगिती दिली आहे. विद्यापीठांसाठी कोट्यवधी डॉलर्सचा निधीही गोठवला आहे. अमेरिकेतील हार्वर्डसारख्या काही उच्चभ्रू संस्था, अमेरिकेच्या अध्यक्षांच्या मते खूप उदारमतवादी आहेत. अनेक अमेरिकन विद्यापीठांना त्यांच्या निधीचा मोठा हिस्सा परदेशी विद्यार्थ्यांकडून मिळत असतो.

**<u>रशिया-ऑपसिंदूर</u>**

रशियाचे भारतातील राजदूत डेनिस अलिपोव्ह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचं कौतुक केलं असून 22 एप्रिलला झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागील गुन्हेगारांची ओळख पटवणं, त्यांचा माग काढून त्यांना शिक्षा करण्यासाठी भारतानं केलेल्या कामगिरीचं त्यांनी कौतुक केलं आहे. भारत आणि रशिया दोघेही बहु-ध्रुवीय जागतिक व्यवस्थेचं समर्थन करतात असंही त्यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणानंतर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन या वर्षी भारताला भेट देण्याची अपेक्षा आहे, अशी पुष्टी क्रेमलिननं केली आहे. दोन्ही

नेत्यांमधील वार्षिक बैठकांसाठी सुरू असलेल्या वचनबद्धतेचा एक भाग म्हणून ही भेट नियोजित आहे. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांची याआधीची भारत भेट 2021 मध्ये नवी दिल्लीत झालेल्या 21 व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेदरम्यान झाली होती. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी गेल्या वर्षी रशियाला दोनवेळा भेटी दिल्या आहेत, जुलैमध्ये 22 व्या रशिया-भारत शिखर परिषदेला ते उपस्थित राहिले आणि नंतर ऑक्टोबरमध्ये काझान इथं झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी झाले होते. या महिन्याच्या सुरुवातीला, पुतिन यांनी पंतप्रधान मोदी यांना फोन करून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा 'तीव्र निषेध' केला होता आणि दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारताला पूर्ण पाठिंबा दिला होता.

**<u>आशियाई-ॲथलेटिक्स</u>**

दक्षिण कोरियातल्या गुमी इथं झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं काल आपलं 4 गुणिले 400 मीटर मिश्र रिले जेतेपद यशस्वीरित्या कायम ठेवलं. चीन आणि श्रीलंकेला मागे टाकत रूपल चौधरी, संतोष कुमार तमिलारासन, विशाल टीके आणि सुभा वेंकटेशन या भारतीय खेळाडूंनी 3 मिनिटे 18.12 सेकंदाची वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकलं.

**<u>बॅडमिंटन</u>**

बॅडमिंटनमध्ये, भारताच्या सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं काल सिंगापूर खुल्या सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेत विजयी पुनरागमन केलं. त्यांनी 32 व्या फेरीत मलेशियाच्या चुंग होन जियान आणि मुहम्मद हैकल यांचा केवळ 40 मिनिटांत 21-16, 21-13 असा पराभव केला. 41 व्या क्रमांकावर असलेल्या मलेशियन जोडीवर सात्विक आणि चिरागचा हा दुसरा विजय होता.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.